# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(formerly University of Pune)

## जाहीर प्रकटन

**व्यवस्थापन प्रतिनिधींच्या गटातून अधिकार मंडळांच्या निवडणूकीकरीता मतदार यादी तयार करण्यासाठी नोंदणी.**

**विषय : संलग्न महाविद्यालय/परिसंस्था यांच्या व्यवस्थापन प्रतिनिधींच्या गटाने त्यांच्यामधून विद्यापीठाच्या अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सहा प्रतिनिधींच्या निवडणुकीकरिता मतदार यादी तयार करण्यासाठी ऑनलाईन नाव नोंदणी करणेबाबत..**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम (२८)(२)(त)((28)(2)(p)) अन्वये अधिसभेवर सहा (६) प्रतिनिधी संलग्न महाविद्यालय/परिसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून विद्यापीठ अधिसभेवर निवडून द्यावयाचे आहेत. यासंबंधीच्या तरतूदी खालीलप्रमाणे उध्दृत करण्यात येत आहेत.

कलम २(३७) "व्यवस्थापन" याचा अर्थ, ज्यांच्या व्यवस्थापनाखाली एका किंवा अधिक महाविद्यालयांचे किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थाचे किंवा उच्च शिक्षणाच्या इतर परिसंस्थांचे संचालन करण्यात येते आणि त्यांना विद्यापीठाचे विशेषाधिकार बहाल करण्यात येतात असे, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमान्वये, नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही विश्वस्त मंडळाचे किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही संस्थेचे किंवा कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ८ अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या कंपनीचे विश्वस्त किंवा व्यवस्थापन किंवा नियामक मंडळ, - मग त्याला कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो, - असा आहे ;

परंतु, केंद्र सरकार किंवा राज्य शासन किंवा जिल्हा परिषद, नगरपरिषद किंवा महानगरपालिका यांसारखे स्थानिक प्राधिकरण यांनी स्थापन केलेल्या किंवा त्यांच्याकडून चालवण्यात येणा-या कोणत्याही महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या बाबतीत, व्यवस्थापन याचा अर्थ, अनुक्रमे, यथास्थिती, केंद्र सरकार किंवा राज्यशासन किंवा जिल्हा परिषद किंवा नगरपरिषद किंवा महानगरपालिका, असा आहे ;

कलम २(१६) "व्यवस्थापन प्रतिनिधींचा गट" याचा अर्थ, जे संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा परिसंस्थांच्या व्यवस्थापन समित्यांचे प्रतिनिधी आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडून येतील अशा, संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा परिसंस्थांच्या व्यवस्थापन समित्यांच्या प्रतिनिधींचा मिळून बनलेला निर्वाचक गण, असा आहे ;

कलम २८(२)(त) संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे व्यवस्थापनाचे सहा प्रतिनिधी, ज्यापैकी किमान एक आळीपाळीने अनुसुचित जाती किंवा अनुसुचित जमाती किंवा निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती, किंवा इतर मागासवर्ग या प्रवर्गातील व्यक्ती असेल आणि एक महिला असेल ;

परंतु निवडून द्यावयाचे व्यवस्थापनाचे असे प्रतिनिधी, राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्विकृती परिषदेने किंवा, यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्विकृती मंडळाने अधिस्विकृती दिलेल्या महाविद्यालयांच्या व्यवस्थापनाचे प्रतिनिधी असतील ;

परंतु आणखी असे की, जेथे व्यवस्थापन, एक वा त्याहून अधिक महाविद्यालये किंवा परिसंस्था चालवित असेल त्याबाबतीत, अशा व्यवस्थापनाचा केवळ एक प्रतिनिधी हा व्यवस्थापन प्रतिनिधीच्या गटामध्ये समाविष्ट होण्याकरीता पात्र असेल ;

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ या तरतूदींना अनुसरुन पात्रता धारण करणा-या व्यवस्थापनाच्या प्रत्येकी एका प्रतिनिधीची माहिती विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नमून्यामध्ये रविवार, दि. १९ जून, २०२२ ते गुरुवार दि. ३० जून, २०२२ पर्यंत online पध्दतीने सादर करावी. तसेच त्या माहितीची छापील प्रत व्यवस्थापनाच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाच्या (विहित नमुन्यातील) प्रतीसह विद्यापीठ कार्यालयाकडे रविवार, दि. ०३ जुलै, २०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोचेल अशा रितीने पाठवावी. आवश्यकता भासल्यास खास दुतामार्फत माहिती पाठवावी. ठरावाच्या प्रतीवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २(३७) मध्ये अभिप्रेत असलेल्या "विश्वस्त किंवा व्यवस्थापन किंवा निमायक मंडळाच्या" अध्यक्ष आणि सचिवाची स्वाक्षरी व इतर माहिती असणे आवश्यक आहे. **वरील तारखेनंतर आलेली माहिती, अपूर्ण माहिती व ठराव विहित नमुन्यात नसल्यास विचारात घेतली जाणार नाही आणि** त्यातील नावाचा मतदार यादीमध्ये समावेश केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम (२८)(२)(त)((28)(2)(p)) नुसार अधिसभा या प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडणूक लढविण्यासाठीच्या पात्रता शर्ती उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि. २८ एप्रिल, २०१७ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये विहित केलेल्या आहेत.

आपणास पुढे असेही कळविण्यात येते की, व्यवस्थापनाच्या प्रतिनिधीने त्यांचा email id व मोबाईल नंबरची माहिती सोबत देणे आवश्यक आहे.

याबाबत काही शंका / अडचणी असल्यास विद्यापीठाच्या निवडणूक विभागास election@unipune.ac.in या e-mail id वर मेल करावा अथवा इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी सेल (०२०-७११७३४६८) या विभागाशी संपर्क साधावा.

यासदंर्भात पुढे असेही कळविण्यात येते की, एकदा मतदार यादी प्रसिध्द केल्यानंतर त्यामध्येही फक्त वर निर्देश केलेल्या तारखेपूर्वी कळविलेल्या नावात दुरुस्ती किंवा कळविलेल्या नावामध्ये काही नावे मतदार यादीतून वगळली गेली असल्यास किंवा कळविलेल्या नावामध्ये चुकीच्या नोंदी झालेल्या असल्यास व त्या संबंधीत संस्थेने किंवा संबंधीत प्रतिनिधीने विहित मुदतीत कार्यालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर दुरुस्तीबाबत विचार केला जाईल. मात्र वरील मुदतीनंतर नव्याने नावे कळविल्यास म्हणजेच पूर्वीच्या नावाऐवजी दुस-या व्यक्तीचे नाव कळविल्यास अशा नावांचा समावेश कोणत्याही परिस्थितीत मतदार यादीत केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**(डॉ. प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/१९
दिनांक : १८/०६/2022

सोबत : ठरावाचा विहित नमुना.

**प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-**

मा.अध्यक्ष/मा.सचिव
सर्व संलग्न महाविद्यालये व परिसंस्था यांचे
व्यवस्थापन मंडळ.

(संस्थेच्या लेटर हेडवर)

<u>विहित नमूना</u>

## विश्वस्त किंवा व्यवस्थापन किंवा निमायक मंडळाचा ठराव

**प्रस्ताव :** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २८(२)(त) (Section 28(2)(p)) नुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्था यांच्या व्यवस्थापन प्रतिनिधींच्या गटाने त्यांच्यामधून विद्यापीठाच्या अधिसभेवर निवडून द्यावयाचे प्रतिनिधी यांच्या निवडणुकीसाठी मतदार म्हणून नाव नोंदणी करण्याकरिता व्यवस्थापन प्रतिनिधीचे नाव कळविण्याबाबत.

### <u>ठराव</u>

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २८(२)(त) (Section 28(2)(p)) नुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्राधिकरणावर निवडून द्यावयाच्या व्यवस्थापन प्रतिनिधीकरिता करण्यात येणा-या मतदार यादीत (निवडणूक २०२२) समावेश करण्याकरिता आमच्या ____________________ या संस्थेचे व्यवस्थापन प्रतिनिधी म्हणून श्री./श्रीमती ____________________ यांचे नामनिर्देशन करण्यात येत आहे.

**बैठकीचा दिनांक :**

**सूचक :** ----------------------------------------

**अनुमोदक :** ----------------------------------------

| **अध्यक्ष** | **संस्थेचा शिक्का** | **सचिव** |
|---|---|---|
| संपूर्ण नाव : | | संपूर्ण नाव : |
| सही : | | सही : |

संस्थेचे नाव :

संस्थेचा सांकेतांक क्रमांक (PUN Code):

दिनांक :

ठिकाण :